नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०२/०६/२०२६ (मंगळवार )

## ४८५ ग्रॅम अंमली पदार्थ (मेफेड्रोन पावडर) सह ४० लाख २५ हजारांचा मुद्देमाल जप्त, ३ आरोपी अटक
## स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवद** – दिनांक ०२/०६/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त बातमीदाराने खात्रीशीर माहीती दिली की, **केळवद टोल नाक्या जवळ मध्य प्रदेश राज्यातुन येणाऱ्या एका स्कार्पिओ वाहनामध्ये एम डी** (मेफेड्रोन पावडर) **अंमलीपदाथ विक्री करिता आणण्यात येणार आहे.** नमुद पथकाने मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण ,श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर उपविभाग आणि श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल उपविभाग मार्गदर्शनात मिळालेल्या माहीतीच्या आधारे तसेच सायबर पोलीस स्टेशन यांनी दिलेल्या तांत्रिक माहीतीच्या आधारे **केळवद टोल नाका येथे** सापळा रचुन कारवाई केली असता **महिंद्रा स्कार्पियो क्रमांक एम पी ०४ झेड एक्स ५४९३ हे वाहन मिळुन आले. नमुद वाहनात चालक आरोपी क्रं १) गोविंद नन्नीलाल पाल, वय ३९ वर्ष ,रा. हरसुल, जि. होशंगाबाद, राज्य मध्य प्रदेश ह.मु. सौंसर, जि पांढुर्णा, राज्य मध्य प्रदेश, याच्यासह आरोपी क्रं २) लालताप्रसाद शंभूप्रसाद पटेल, वय ५३ वर्ष, रा.परसिद्धी, करवली खुर्द, जि. सिद्धी, राज्य मध्य प्रदेश,३) दीपक धनराज देठे, वय ३३ वर्ष, रा. सौंसर, जि पांढुर्णा, राज्य मध्य प्रदेश हे मिळुन आले. पोलीस पथकाने पंचासमक्ष नमुद वाहनाची झडती घेतली असता त्यांना वाहनामध्ये अंमली पदार्थ मेफेड्रोन पावडर मिळुन आला.**

पोलीसांनी पंचासमक्ष १) एम.डी (मेफेड्रोन पावडर) वजन ४८५ ग्रॅम किंमती २४,२५,०००/—रूपये, २) महिंद्रा स्कार्पियो क्रमांक एम पी ०४ झेड एक्स ५४९३ , ३) एक आय फोन, आणि ४) दोन ॲड्रॉईड फोन असा एकुण ४०,२५,०००/— रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद प्रकरणी आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन केळवद येथे कलम ८ (क), २२ (क),२९ एन. डी. पी. एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. वर नमुद तिन्ही आरोपी यांना सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे.




कारवाई करणारे स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण चे पथक जप्त मुद्देमालासह

# अल्पवयीन बालीकेचा विनयभंग करणाऱ्या आरोपीला मा न्यायालयाने सुनावली शिक्षा

**पोलीस स्टेशन काटोल** :— फिर्यादी हीच्या तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन काटोल येथे अप क्र. ५१५/२०२१ कलम ४५१, ३५४ भादवी सहक. १२ पोक्सो अन्वये गुन्हा नोंद झालेला होता. सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, दिनांक ०५/१०/२०२१ रोजी दुपारी यातील फिर्यादी ही घरी हजर नसतांना यातील **आरोपी नामे लिलाधर दयाराम बागडे, वय ४५ वर्षे, रा. खुटांबा, ता. काटोल, जि. नागपुर** याने सदर फिर्यादीची अल्पवयीन मुलगी, वय ११ वर्षे ही घरी हजर असतांना अनाधिकृत पणे घरात घुसुन अल्पवयीन पिडीतेला अश्लिल स्पर्श करून तिचा विनयभंग केला.

प्रथम तपासी अधिकारी श्रीमती लता सागरकर, ब.नं १४०० पोस्टे काटोल आणि त्यानंतरचे तपासी अधिकारी श्रीमती सारिका गुरूकर, पोलीस उपनिरीक्षक, नेम पोलीस स्टेशन नरखेड कॅम्प काटोल यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. **दिनांक ०१/०६/२०२६ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश क्रं १६ श्री एन. आर. तळेकर यांनी नमुद आरोपी नामे लिलाधर दयाराम बागडे, वय ४५ वर्षे, रा. खुटांबा, ता. काटोल, जि. नागपुर यास कलम ४५१ भादवि मध्ये १ वर्ष सश्रम कारावास व १००० /— रूपये दंड , दंड न भरल्यास १ महिना साधा कारावास, कलम ३५४ भादवि मध्ये १ वर्ष सश्रम कारावास व १००० /— रूपये दंड , दंड न भरल्यास १ महिना साधा कारावास, सह कलम १२ पोक्सो मध्ये भादवि मध्ये १ वर्ष सश्रम कारावास व १००० /— रूपये दंड , दंड न भरल्यास १ महिना साधा कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्रीमती रश्मी खापर्डे यांनी काम पाहीले. सदर खटल्याच्या सुनावली दरम्यान श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल उपविभाग, पोलीस निरीक्षक श्री. रणजित शिरसाठ, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन काटोल, पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी, दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण, सपोनि श्री विशांत नांदगाये, पोहवा श्री रामदास कोराम, ब.नं २२४ , नेम. दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण यांनी महत्वपुर्ण योगदान दिले. कोर्ट कामात पैरवी पोहवा बाबा नेवारे, ब. नं. ८२ पोलीस स्टेशन काटोल यांनी मदत केली आहे.

# जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
# ३ वाहनांसह २२ लाख १२ हजारांचा मुद्देमाल जप्त
# १० गोवंश जनावरांची सुटका, कळमेश्वर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— दिनांक ३१/०५/२०२६ रोजी कळमेश्वर पोलीसांना खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या गोवंश जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा राउळगाव बसस्टॉप रोडवर नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान तिन संशयित वाहन येताना दिसले. १) महिंद्रा मॅक्सी क्र एम एच ३२/एजे २५३१ २) महिंद्रा पिकअप गाडी क्र एम एच ४०/ बी जी ४०६५ ३) टाटा इंट्रा क्र.एम एच ४० सी टी ०८३१ येताना दिसले. पोलीसांनी वाहन थांबविण्याचा इशारा केला असता यातील चालकांनी पोलीसांना पाहुन दुर अंतरावर वाहन थांबवुन घटनास्थळाहुन पळुन गेले. पोलीसांनी वाहन थांबवुन तपासणी केली असता वाहन क्र. १) मध्ये ०३ बैल, वाहन क्र. २) मध्ये ०४ बैल, वाहन क्र. ३) मध्ये ०३ बैल असे एकुण १० गोवंश जनावरे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यंत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन निर्दयतेने कत्तलीकरीता वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले.

**पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून तिन्ही वाहन किंमती २०,००,०००/—रूपये आणि १० बैल जनावरे किंमती २,१२,०००/—रूपये असा एकुण २२,१२,०००/—रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. सदर प्रकरणी नमुद वरील चालक/मालक यांचेविरूद्ध कलम ११(१), (ड) प्राणी छळ प्रतिबंधक अधिनियम सहकलम ५(ए), ५(बी) महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

# प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची विक्री करीता साठवणुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, ७० हजार ३९० रूपयांचा मूद्देमाल जप्त, रामटेक पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन रामटेक** :— दिनांक ०१/०६/२०२६ रोजी रामटेक पोलीस पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, मौजा नगरधन येथे राजेश मोतीराम ढवरे याने त्याचे राहते घरी महाराष्ट्रात प्रतिबंध असलेला सुगंधित तंबाखु विक्री करीता साठा करून ठेवला आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा नगरधन येथे आरोपी राजेश मोतीराम ढवरे, रा. वार्ड क्र. ५, नगरधन ता. रामटेक याच्या घराची पंचासमक्ष घरझडती घेतली असता महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला. **पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष एकुण ७४.०१ किलो प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु किंमती ७०,३९०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

नमुद आरोपीने सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उत्पादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा केला होता. आरोपी **राजेश मोतीराम ढवरे, वय ३४ वर्षे, रा. वार्ड क्र. ५, नगरधन ता. रामटेक** यांचेविरूद्ध पोस्टे रामटेक येथे अन्न सुरक्षा आणि मानके अधि. २००६ सहकलम १२३, २७४, २७५, २२३ भारतीय न्याय संहीता अन्वये गुन्हा नोंद केला आहे. **नमुद आरोपीला अटक करण्यात आली आहे.**

# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, ०८ लाख ६ हजारांचा मुद्देमाल जप्त स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन नरखेड** :— दिनांक ०१/०६/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण चे पथक पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मध्यप्रदेश राज्यातुन अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी वडचिचोली ते सावरगाव मार्ग सावरगाव शिवार येथे नाकाबंदी केली असता महिंन्द्रा ४७५ डी आय कंपनीचा ट्रॅक्टर क्र. एम. पी. २८/ए. डी ४८०९ ट्रॉलीसह मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. **वाहन चालक निखिल ईश्वर गवळी, वय १९ वर्ष, रा. इंद्र नगर वार्ड क्र. १८, वडचिचोली ता. पांढुर्णा हा मिळुन आला.** आरोपीस रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. मालकाबाबत विचारपुस केली असता **मनोहर रामचंद्र उघडे, वय ५० वर्ष, रा. वार्ड क्र. ०१, गायत्री मंदीर वडचिचोली, ता. पांढुर्णा मध्यप्रदेश** यांचे सांगणेवरून मध्यप्रदेश राज्यातुन अवैध रित्या रेतीची वाहतुक करून रेती चोरी केल्याची माहीती प्राप्त झाली.

**पोलीसांनी पंचासमक्ष ट्रॅक्टर क्र. एम. पी. २८/ए. डी ४८०९ किंमती ८००,०००/— रूपये आणि ०१ ब्रास रेती किंमती ६,०००/— रूपये असा एकुण किमती ८०६०००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन नरखेड येथे कलम ३०३(२), ४९ भा.न्या.सं २०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

# पोलीस स्टेशन वडोदा अंतर्गत खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीस अटक

**पोलीस स्टेशन वडोदा :—** दिनांक ०१/०६/२०२६ रोजी फिर्यादी देवेंद्र लेंखचंद बिसेन, वय ३८ वर्षे, रा. महाविष्णुनगर नरसाळा नागपुर यांनी पोलीस स्टेशन वडोदा येथे तक्रार दिली की, दिनांक ३०/०५/२०२६ ते दिनांक ३१/०५/२०२६ रोजी फिर्यादीचा मावस भाऊ अंकित सुरतलाल चौधरी, वय ३१ वर्ष, रा. छिन्दलाई, ता. लालबर्रा, जि. बालाघाट मध्यप्रदेश हा नागपूर यास कोणीतरी अज्ञात इसमाने मौजा खेडी शिवार येथील वृंदावन लॉन जवळ जीव घेण्याच्या उद्देशाने त्याच्या डोक्याला मारहाण करून गंभीर जखमी केले. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन वडोदा येथे कलम **१०९(१) भान्यासं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.**

**पोलीसांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून जखमीचा भाऊ आरोपी नामे ललित सूरतलाल चौधरी, वय २८ वर्षे, रा. छिन्दुलाई, ता. लालबर्रा, जि. बालाघाट यास तात्काळ ताब्यात घेतले. जखमी आणि आरोपी यांच्यात आपसी मतभेद असल्याच्या कारणावरून आरोपी याने जखमीला जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याचे तपासात उघड झाले. नमुद आरोपीला वडोदा दिनांक ०१/०६/२०२६ रोजी अटक केली आहे.**

# नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ८०३ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ०२/०६/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २३ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ८०३ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३२ आरोपी अशा एकुण ९४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ५१ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २५ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २४ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३६ आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १२ आरोपी अशा एकुण १४८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ५२ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३५ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३५ आरोपी अशा एकुण १४९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३६ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २१ आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १८ आरोपी अशा एकुण ७५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ५१ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३४ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे ३५ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २५ आरोपी अशा एकुण १४५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ६६ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५४ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ४२ आरोपी अशा एकुण १९२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २३ पोलीस स्टेशन येथे एकुण ८०३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**





मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने